# भारतीय लोकशाहीत राजकिय पक्षांची भूमिका

**प्रा. निहाळ रामदास बाबाजी**
राज्यशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय,
बदनापुर ता. बदनापुर जि. जालना.

**प्रस्तावनाः**

लोकशाहीमध्ये राजकिय पक्षांना खुप महत्त्व असते. राजकिय पक्षांशिवाय लोकशाहीची कल्पनाच केल्या जात नाही. राजकिय पक्ष निवडणूकीच्या माध्यमातून लोकशाहीमध्ये सत्ता स्थापन करित असतात. राजकिय पक्ष म्हणजे राष्ट्राची राजकिय सत्ता प्राप्त करून घेऊन ती वापरण्याच्या उद्देशाने संघटीत झालेल्या राष्ट्रातील नागरिकांचा समूह होय. राजकिय पक्षांचा मूख्य उद्देश हा सत्ता मिळवणे हा आहे. भारतामध्ये राजकिय पक्षांची निर्मिती ही भारत स्वातंत्र्य होण्या अगोदरच झाली होती. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची निर्मिती ही २८ डिसेंबर १८८५ रोजी झाली होती.

सुरवातीलच्या काळात काँग्रेस पक्ष हा एक स्वतंत्र चळवळ म्हणून कार्य करित असे. काँग्रेस नंतर स्वातंत्र्याच्या आगोदर अनेक राजकिय पक्षांची निर्मिती झाली त्यामध्ये स्वराज्य पक्ष तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला स्वतंत्र मजूर पक्ष होय. भारतातील राजकिय पक्षांचा विकास खऱ्या अर्थाने भारत स्वतंत्र झाल्यानंतरच झाला. सध्या भारतात अनेक राजकिय पक्ष निर्माण झालेले आहे. त्यामध्ये शिवसेना, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष, द्रविड मुन्नेत्र कडघम, तृणमुल काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यासारख्या अनेक राजकीय पक्षांची निर्मिती झालेली आहे. राजकिय पक्षांनी भारतीय लोकशाहीत स्थिरता देण्याचे कार्य केले आहे.

**उद्दिष्ट्येः**

१. भारतातील राजकिय पक्षांचा अभ्यास करणे

२. भारतीय लोकशाहीत राजकिय पक्षांनी निभावलेल्या भुमिकेचा अभ्यास करणे.

३. भारतीय लोकशाहीतील राजकिय पक्षांच्या कार्याचा आढावा घेणे.

**गृहितकेः**

१. भारतीय लोकशाहीत राजकिय पक्षांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

२. भारतीय लोकशाही मजबूत करण्यात राजकिय पक्षांनी महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे.

**भारतीय लोकशाहीत राजकिय पक्षाची भूमिका**

लोकशाही देशामध्ये वेगवेगळी राजकिय पक्षपध्दती आहे. काही देशामध्ये एकपक्ष पध्दती आहे तर काही देशामध्ये द्विपक्षपध्दती आहे तर काही देशामध्ये बहुपक्षपध्दती आहे. एक पक्षपध्दतीत एकच राजकिय पक्ष असतो. तर द्विपक्षपध्दतीत त्या देशामध्ये दोनच राजकिय पक्ष असतात तर बहुपक्षपध्दतीत अनेक राजकिय पक्ष असतात. भारताने बहुपक्षपध्दतीचा स्विकार केलेला आहे. यामुळे भारतता अनेक राजकिय पक्षांची निर्मिती झालेली आहे. भारतात काही राष्ट्रीय पक्षांची निर्मिती झालेली आहे. तर काही प्रादेशिक पक्षांची निर्मिती झालेली आहे. राष्ट्रीय पक्षांचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण देशापूरते मर्यादित राहते तर प्रादेशिक राजकिय पक्षांचे कार्यक्षेत्र हे एका प्रदेशापूरते मर्यादित राहते. राजकिय पक्ष हे आपले निवडणूकिच्या रिंगणात आपले उमेदवार उभे करून निवडून आणण्याचा प्रयत्न करित असतात. तसेच निवडणूकीच्या माध्यमातून सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करित असतात. भारतातील प्रादेशिक राजकिय पक्षांची निर्मिती ही वेगवेगळ्या विचारसरणीच्या आधारावर झालेली आहे. भारतातील प्रत्येक राजकिय पक्षाला एक विशिष्ट विचारसरणी असते.

प्रत्येक राजकिय पक्ष हा निवडणूकीच्या पूर्वी आपल्या पक्षाचा जाहिरनामा प्रसिध्द करित असतात. राजकिय पक्ष सत्तेवर आल्यानंतर निवडणूक पूर्व दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करित असतात. भारताने बहुपक्षपध्दती स्विकारलेली असल्याने भारतात अनेक राजकिय पक्षांची निर्मिती झालेले आहे.

भारतात कोणत्याच राजकिय पक्षाला एकहाती सत्ता मिळणे कठीण झाले आहे. यामुळे एकाच विचारसणीचे अनेक पक्ष एकत्रीत येऊन आघाडी निर्माण करून सत्ता स्थापन करू लागले. बहुपक्षपध्दतीत मतदारांना उमेदवार निवडून देण्यासाठी अनेक विकल्प असतात. निवडणूकीमध्ये प्रत्येक राजकिय पक्ष हा आपल्या विरोधी राजकिय पक्षांपेक्षा जास्त मते मिळवून निवडून येण्याचा प्रयत्न करित असतात. तसेच बहुपक्षपध्दतीमध्ये एखादा राजकिय पक्ष जर सत्तेवर आला तर त्याला विकासात्मक कार्य हे करावेच लागतात कारण दूसऱ्या निवडणूकित त्या सत्ताधारी राजकिय पक्षाला कमी मते मिळण्याची जास्त शक्यता असते. म्हणून सत्तेवर टिकण्यासाठी सत्ताधारी पक्षाला विकासात्मक कार्य करावेच लागतात. तसेच ज्या राजकिय पक्षाला कमी मते मिळतात असा राजकिय पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्य करित असतो. विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षांच्या चुका जनतेच्या निदर्शनात अणून देण्याचा प्रयत्न करित असतात.

भारतामध्ये सुरूवातीच्या काळामध्ये एकाच राजकिय पक्षांचा प्रभाव होता. सुरूवातीच्या काळामध्ये कॉँग्रेस या एकाच पक्षाचे वर्चस्व होते. केंद्र सरकारमध्ये १९५२ ते १९७७ पर्यंत एकाच कॉँग्रेस पक्षाचीच एकहाती सत्ता होती. १९७७ मध्ये केंद्रात प्रथमच कॉँग्रेसचे सरकार जाऊन मोरारजी देसाई हे पहिले गैरकॉँग्रेस पक्षाचे पहिले पंतप्रधान बनले. तसेच १९६६ पर्यंत राज्यांतील विधानसभेमध्ये कॉँग्रेसलाच बहुमत मिळत असे. १९६७ नंतर अनेक राज्यामध्ये गैरकॉँग्रेस पक्षांची सराकर स्थापन होऊ लगली. तेव्हापासून भारतात बहुपक्षपध्दती निर्माण झाली आहे. भारतात अनेक जाती, भाषा, धर्म, प्रादेशिकता या आधारवर अनेक राजकिय पक्ष स्थापन झाले आहे. प्रत्येक राज्यामध्ये वेगवेगळे प्रादेशिक राजकिय पक्ष स्थापन झालेले आहे. प्रादेशिक राजकिय पक्षांचा उद्देश हा त्या प्रदेशाचा विकास करणे हा आहे.

प्रादेशिक राजकिय पक्षांच्या निर्मितीचे मुख्य कारण म्हणजे राष्ट्रीय पक्षाचे प्रादेशिक प्रश्नांकडे होत असलेले दुर्लक्ष होय. यातूनच प्रदेशिक पक्ष हे केंद्राच्या सत्तेत आघाडी करून सहभागी होत असतात आणि आपल्या प्रदेशाचा आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न करित असतात.. प्रादेशिक राजकिय पक्षांमुळे स्थानिक लोकांना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळते तसेच प्रादेशिक पक्षामुळे लोकांना राजकिय शिक्षण देऊन लोकशाहीचा विकास करण्यास मदत होत असते.

**निष्कर्ष:**

१. भारतातील लोकशाही मजबूत करण्यात राजकिय पक्षांनी महत्त्वाची भुमिका निभावलेली आहे.

२. राजकिय पक्षांमुळे लोकांना राजकिय शिक्षण मिळण्यास मदत झाली आहे.

३. प्रादेशिक पक्षांमुळे स्थानिक प्रादेशातील समस्या सोडवण्यास मदत झालेली आहे.

**संदर्भ:**

१. सुभाष सी. कश्यप, आपली संसद, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

२. डॉ. पंडित नलावडे, भारतीय लोकशाही स्थिती आणि गती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

३. शुभांगी राठी, भारताचे शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद